# लातूर शहर महानगरपालिका, लातूर
## एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी
## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान

जाक्र/लाशमनपा / 297 / दि. 12 / 01 /२०२४

## कंत्राटी पदभरती जाहीरात

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत व १५ वा वित्त आयोग अंतर्गत लातूर शहर महानगरपालिका, लातूर, आरोग्य विभाग येथे विविध संवर्गातील रिक्त पदांची, कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर पदभरती प्रक्रिया राबविण्यात येत आहेत.

सदरील पदभरती जाहिरात, पदांची संख्या, आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव, सामाजिक आरक्षण, नियुक्तीचे ठिकाण, अर्जाचा नमुना, नियम, अटी व शर्ती हया राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई व लातूर शहर महानगरपालिका येथील संकेतस्थळ (www.nrhm.maharashtra.gov.in), (www.arogya.maharashtra.gov.in) (www.mclatur.org) संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले असून, इच्छुक उमेदवारांनी संकेतस्थळावरुन अर्जाचा नमुना **Download** करून, जाहिरातीतील आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह दि. 25/ 01 /२०२४ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावा.

**SD -/-**
अध्यक्ष निवड समीती तथा
आयुक्त
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

# लातूर शहर महानगरपालिका, लातूर
## एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी
## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान
## कंत्राटी पदभरती जाहीरात

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमासाठी खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

लातूर महानगरपालिका पदस्थापना

तक्ता क्र. ०१

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियांन अंतर्गत रिक्त पदे **(NUHM)**

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन | नियुक्ती | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वैदयकीय अधिकारी (पुर्ण वेळ) | **03** | **MBBS MC/MMC Council** कडील नोंदणी अनिवार्य | ७० वर्ष | ६००००/- | प्रा.ना.आ.केंद्र | अनु.जाती. १<br>अनु.जमाती १<br>खुला १ |
| **2** | **Epidemiologist** | **01** | **Any medical Graduate with MPH / MHA /MBA in Health** | ७० वर्ष | ३५०००/- | आरोग्य विभाग मुख्यालय | खुला १ |
| **3** | **Microbiologist** | **01** | **MBBS with MD Microbiology from institute recognized by Medical Council of India** कडील नोंदणी अनिवार्य | ७० वर्ष | ७५०००/- | आरोग्य विभाग मुख्यालय | खुला १ |

तक्ता क्र. ०२

१५ वा वित्त आयोग अंतर्गत रिक्त पदांचा तपशील **(15$^{th}$ Finance)**

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयो मर्यादा | एकत्रित मानधन | नियुक्ती | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वैदयकीय अधिकारी | 16 | **MBBS MC/MMC Council** कडील नोंदणी अनिवार्य | ७० वर्ष | ६००००/- | नागरी आरोग्य मंदीर **(UHWC)** | अनु.जाती ०३<br>वि.जा.(अ) ०१<br>भ.ज.(ब) ०१<br>भ.ज.(क) ०१<br>भ.ज (ड)/ वि.मा.प्र ०१<br>इ.मा.व. ०३<br>ई.डब्ल्यु.एस. ०१<br>खुला ०५ |
| 2 | स्टाफ नर्स | 17 | **GNM/Bsc Nursing Maharashtra Nursing Council** कडील नोंदणी अनिवार्य | ६५ वर्ष | २००००/- | नागरी आरोग्य मंदीर **(UHWC)** | अनु.जाती ०२<br>वि.जा.(अ) ०१<br>भ.ज.(क) ०१<br>भ.ज (ड)/ वि.मा.प्र ०१<br>इ.मा.व. ०३<br>खुला ०९ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | पुरुष बहुउद्देशीय कर्मचारी (Male MPW) | 16 | 12 Science Pass & Basic Paramedical Training Course or Sanitary Inspector Course | ६५ वर्ष | १८०००/- | नागरी आरोग्य मंदीर (UHWC) | अनु.जाती ०१<br>वि.जा.(अ) ०१<br>भ.ज.(ब) ०१<br>भ.ज.(क) ०१<br>इ.मा.व. ०३<br>ई.डब्ल्यु.एस. ०२<br>खुला ०७ |

## तक्ता क्र. ०३

### १५ वा वित्त आयोग अंतर्गत रिक्त पदांचा तपशील (Polyclinic)

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन | कामाचे ठिकाण | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **Physician** | **04** | **MD Medicine / DNB** | ७० वर्ष | **To visit once in every fortnight. Rs. 2000 to be paid as fixed amount per visit + Rs.100 Per patient checked of his / her specialty to maximum Rs. 5000/- Visit** | **Polyclinic/ प्रा.ना.आ.केंद्र UPHC** वेळ ०४ तास | मानसेवी तज्ञ असल्यामुळे बिंदुनामावली लागू नाही. |
| 2 | **Obstetrics & Gynecologist** | **04** | **MD /MS Gyn / DGO /DNB** | ७० वर्ष | | | |
| 3 | **Pediatrician** | **04** | **MD Pead / DCH /DNB** | ७० वर्ष | | | |
| 4 | **Ophthalmologist** | **04** | **MD Opthalmologist /DOMS** | ७० वर्ष | | | |
| 5 | **Dermatologist** | **04** | **MD (Skin/VD)/DVD, DNB)** | ७० वर्ष | | | |
| 6 | **Psychiatrist** | **04** | **MD Psychiarty /DPM /DNB** | ७० वर्ष | | | |
| 7 | **ENT Specialist** | **04** | **MS ENT / DORL / DNB** | ७० वर्ष | | | |

उपरोक्त पदांसाठी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज व प्रमाणपत्राच्या सांक्षाकिंत केलेल्या छायांकित प्रतिसह रिक्त असणाऱ्या पदांसाठी जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन दि. 25 .०१.२४ रोजी संध्याकाळी ५.४५ वाजेपासुन (सुट्टीचेदिवस वगळून) नागरी सुविधा केंद्र विभाग 'महानगरपालिका, लातुर या ठिकाणी सकाळी १०.३० ते सायं ०५.४५ पर्यंत या वेळेत सादर करावेत. दि. 25 .०१.२४ रोजी संध्याकाळी ५.४५ नंतर आलेल्या उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. त्यानंतर आलेल्या उमेदवारांचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही तसेच ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

अटी व शर्ती :-

१) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी १००/- रुपयांचा धनाकर्ष **(Demand Draft)** “एकात्मिक आरोग्य कुटुंब कल्याण सोसायटी' लातूर शहर महानगरपालिका, लातूर” या नावे जोडणे आवश्यक आहे, सदरचा धनाकर्ष या नावाने काढावा. धनाकर्ष हा राष्ट्रीयीकृत बॅकेचा असावा.

२) वैद्यकीय अधिकारी पुर्णवेळ **NUHM** व वैद्यकीय अधिकारी **15** वा वित्त आयोग या पदासाठी पात्र उमेदवारासाठी मुलाखत आयोजित करण्यात येईल. उर्वरीत इतर पदांसाठी गुणांकन पद्धतीनूसार निवड प्रक्रीया केली जाईल. याअंतर्गत अंतिम वर्षाच्या मिळालेल्या एकुण गुणाच्या टक्केवारीच्या ५०% **Proportion** घेण्यात येईल (अधिकतम ५० गुण) व तसेच पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीच्या २०% प्रमाणे **Proportion**

(अधिकतम २० गुण ) घेण्यात  व तसेच संबंधित पदाशी निगडीत अनुभव प्रत्येक १ वर्षामाठी ६ गुण ग्राहय धरण्यात येईल (अधिकतम ३० गुण). याप्रमाणे एकूण १०० गुणानुसार प्रवर्गनिहाय  गुणवत्ता यादी तयार करुन गुणांकन पद्धतीनुसार निवड करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) अनुभवासाठी वैद्यकीय अधिकारी पदासाठी शासकीय तसेच खाजगी रूग्णालयातील अनुभव गृहीत धरण्यात येईल व इतर पदांसाठी फक्त शासकीय,निमशासकीय कामकाजाचा अनुभव ग्राह्य धरण्यात येईल.

४)एकूण पदांच्या ५०% प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल व प्रतीक्षा यादीची स्वतंत्र यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

५)  वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रीत मानधनाची असुन, त्यांचा कालावधी हा दि.२९ जून २०२४ पर्यंतचा राहू शकेल.परंतू, वरील पदे सन २०२४-२५ मध्ये मंजूर झाल्यास व आपले कामकाज समाधानकारक असल्यास  पुढील ११ महिने २९ दिवसाची नियुक्ती देण्यात येईल.

६)  जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी एमबीबीएस विशेषज्ञ यांचेकरीता वयोमर्यादा ७० वर्ष व इतर रुग्णसेवेशी संबंधित पदांसाठी  (परिचारीका, अधिपरिचारीका, पुरुष बहुउद्देशीय कर्मचारी) वयोमर्यादा ६५ वर्ष राहिल.

७)  वय वर्ष ६० नंतर जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारिरिक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या दिवशी सादर करणे अनिवार्य राहील तसेच निवड झाल्यानंतर प्रत्येकवर्षी सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पुर्ननियुक्ती आदेश देण्यात येतील.

८)  उपरोक्त संबधित पदाकरीता तत्सम कॉन्सीलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

९)  जाहिरातीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या पदाकरीता उमेदवारांची संख्या विचारात घेवून गुणवत्तेनुमार मुलाखतीकरीता १ : ५ प्रमाणे उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

१०)  शासकिय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या उमेदवारांना मानधन शासन निर्णय क. संकिर्ण २०१५/प्रक्र/१००/१३ दि. १७.१२.२०१६ व राज्य आरोग्य सोसायटी कडून प्राप्त मार्गदर्शक सुचनानुसार अदा करण्यात येईल.

११)  वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत.  सदर पदावर शासकिय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

१२)  अर्जदारांनी अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्ठपणे नमूद करावा.अश्या उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्र **(Caste Certificate)** जोडणे आवश्यक राहील.

१३) आवश्यक असणाऱ्या आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इतर संवर्गातील उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करण्यात येईल व आरक्षित संवर्गातील उमदेवार उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल.

१४)  केंद्र / राज्य शासनाने संबंधीत पद नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१५)  सर्व पदांसाठी उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेची १० वी (गुणपत्रक / प्रमाणपत्र)  १२ वी (गुणपत्रक / प्रमाणपत्र ) पदवीचे सर्व गुणपत्रक (पहिले वर्ष ते अंतिम वर्ष)  सर्व **Attempt** सह जेणेकरुन एकत्रित गुण काढणे सोईचे होईल. पदवी प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणून (१० व १२ वीचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला)  ही सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (साक्षांकित / स्वसांक्षाकिंत)  जोडावीत. नावात बदल असल्यास राजपत्र, विवाह नोंदणी आणि नोटराईज्ड  ॲफिडेव्हीट जोडणे बंधनकारक राहील.

१६) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१७) अर्ज सादर करणेकामी व मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवानांना प्रवासभत्ता व इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१८) भरती प्रक्रिया स्थगीत करणे / रद्द करणे / पदभरतीत बदल करण्याचे सर्व अधिकार तसेच रिक्त पदांच्या संख्येत, सामाजिक आरक्षण, तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त तथा अध्यक्ष निवड समिती. लातूर शहर महानगरपालिका, लातुर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१९) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

२०) अर्जाचा नमुना हा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्याम, उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

२१) उमेदवारास एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करावयाचे असल्यास स्वतंत्र अर्ज, स्वतंत्र धनाकर्ष सादर करावा. परंतू वेळप्रसंगी एकाच वेळी मुलाखत अथवा परीक्षा घेतली गेल्यास कोणत्यातरी एका पदाकरीता उपस्थित रहावे लागेल ज्या पदास उपस्थिती असेल त्या पदाकरीता उमेदवार ग्राहय धरण्यात येईल. व दुस-या पदाकीरता गैरहजर ग्राहय धरण्यात येईल.

२२) मुलाखतीनंतर निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असलयाबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

२३) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपूष्ठात आणून, प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

२४) इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीच्या दिवशी शैक्षणीक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र इत्यादी साक्षांकीत प्रतिंसह व मुळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी हजर रहावे.

२५) उपरोक्त पदा करीता निवड प्रक्रिया हि प्राप्त अर्जाची छानणी करुन पात्र ठरणाऱ्या उमेदवाराकरीताच राबविण्यात येईल. पात्र / अपात्र उमेदवारांची यादी, अंतिम निवड यादी तसेच मुलाखतीचा दिनांक व वेळ आणि पदभरती संदर्भातील वेळोवेळी प्रकाशीत करण्यात येणाऱ्या सुचना फक्त (**www.nrhm.maharashtra.gov.in** ), (**www.arogya.maharashtra.gov.in**) ( **www.mclatur.org**) या संकेतस्थळावर तसेच अर्ज केलेल्या ठिकाणी नोटीस बोर्डवर प्रकाशित करण्यात येईल याची वेगळी सुचना दिली जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी,

२६) गुणाकंन यादी तयार केलेनंतर दोन किंवा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. व तसेच उमेदवाराचे गुण व वय सारखे असल्यास अशा वेळी उमेदवारांचा संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

२७) १५ वा वित्त आयोग अंतर्गत **UHWC** जसे-जसे कार्यान्वित होतील त्याप्रमाणे निवडयादीतील क्रमवारीनूसार नियुक्ती आदेश देण्यात येतील.

**SD -/-**
अध्यक्ष निवड समीती तथा
आयुक्त
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

# पात्र उमेदवारांमधून निवड प्रक्रिया खालील प्रमाणे राबविण्यात येईल

**(संदर्भ :- मा.आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.१०६७०-११०१६ दि.२७.०४.२०२३ )**

१) **थेट मुलाखती :-** अतिविशेषतज्ञ, विशेषतज्ञ, वैद्यकीय अधिकारी (MBBS) हि पदे थेट मुलाखती घेवून भरण्याकरिता खालील गुणांकन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

१. Subject Knowledge (१०)

२. "Research & Academic Knowledge (१०)"

३. Leadership Quality (१०)

४. Administrative Abilities (१०)

५. Experience (१०)

a) For Govt.Experience – 2 Marks for one Year

b) For Private Experience – 1 Marks for one Year

२) **गुणांकन पद्धती –** MPW , Staff Nurse या पदांकरिता खालीलप्रमाणे गुणांकन पद्धतीनुसार निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.

| **विवरण** | **तपशील** | **अधिकतम गुण** |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying Exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढण्यात येईल. (उदा.६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५० % प्रमाणे Proportion = ६०*५० / १०० = ३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी.) | अधिकतम २० गुण.<br>मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportion काढण्यात येईल. (उदा. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरीक्त B.sc Nursing हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.sc Nursing च्या अंतिम वर्षात ६० % गुण प्राप्त असल्यास त्याचे २० % प्रमाणे Proportion = ६० * २० / १०० = १२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत.(१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| **एकूण** | | **१०० गुण** |

**SD-/-**
**अध्यक्ष निवड समीती तथा**
**आयुक्त**
**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

# कंत्राटी पदाकरिता कार्यालयीन अर्जाचा नमुना सन २०२३-२४
## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, आरोग्य विभाग,
## लातूर शहर महानगरपालिका, लातुर

प्रति,

मा. आयुक्त, तथा अध्यक्ष, निवड समिती
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

पासपोर्ट आकाराचा अलीकडील छायाचित्र स्वतः साक्षांकीत करुन लावावे करावे

पदाचे नाव :- ............................................

१) उमेदवाराचे संपूर्ण नांव : – ............................................

२) उमेदवारांच्या वडिलांचे संपूर्ण नांव–............................................

३) जन्म तारीख - अक्षरी – वर्ष ................ महिना .................... दिवस ..................

अक्षरी:- ............................................................................................................

वय :- ............. वर्ष पूर्ण ............... महिने ............. दिवस ........... (जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिवशी)

४) राहण्याचा पत्ता :- ........................................................................................

........................................................................................

५) पत्र व्यवहाराचा पत्ता :- ........................................................................................

........................................................................................

(मोबाइल क्र. :-...................................... (नमुद करणे अनिवार्य) WhatsApp सुविधा चालू असलेला मो.क्र.देण्यात यावा.

ई–मेल आयडी :- ....................................................................................................(नमुद करणे अनिवार्य)

५) अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे ? होय / नाही

६) अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे होय/नाही जातीचा प्रवर्ग ...........................

- अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग ......................... (नमुद करणे अनिवार्य)
  (आरक्षित संवर्गातील उमेदवारांनी जात प्रमाणपत्र (**Caste Certificate**) जोडणे अनिवार्य)

७) डीडी क्रमांक, तारीख आणि रक्कम - ..............................................................

८) अर्ज करीत असलेल्या पदाच्या आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास नमूद करावे :-

....................................................................................................................................................

९) अर्जदार विवाहित आहे किंवा नाही – आहे /नाही .

९) शैक्षणिक पात्रता :-

| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशील (सर्व) | बोर्ड / विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०) अनुभव (अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी)

| अ.क्र. | ज्या कार्यालयात काम केले आहे त्या कार्यालयाचे नाव व पत्ता | शासकीय /खाजगी | धारण केलेले पद | सन | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

११) अर्जासोबतखालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमुद करावा)

1. ................................ 2. ................................
3. ................................ 4. ................................
5. ................................ 6. ................................
7. ................................ 8. ................................
9. ................................ 10. ................................

१२) वर नमुद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणीक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातील नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण - स्वाक्षरी :-

दिनांक - / /२०२४ अर्जदाराचे संपूर्ण नाव :-

मोबाईल क्र.:-

ई-मेल आयडी :-